**सा.प्रगत भारत**
वृत्तपत्रकाचे आजच सभासद व्हा व घरपोच अंक मिळवा वार्षिक ५००/-रू दोन वर्षे-१०००/- रूपये अधिक माहिती व संपर्क- ९८६०८७७७८९
ताज्या बातम्या पहा..
··www.pragatbhart.com

**सा.प्रगत भारत वृत्तपत्र १८ वा वर्धापन..**संपादकीय पान क्र.२

साप्ताहिक
# प्रगत भारत
Web:www.pragatbharat.com,youtube-pragatbhart,Em-pragagatbhart@gmail.com,mo.9860877789




• वर्ष:१९ • अंक क्र.01 • साप्ताहिक • मंगळवार दि. १६ ते २२ जून २०२६ • RNI/MAH/MRA/2008/25149 • RNP/पोस्ट- PCE/006/2024-2026 • पृष्ठे-४ • किंमत:२.००

# आषाढी पालखी सोहळा
## २०२६ वारकऱ्यांसाठी सर्वोत्तम सुविधा उपलब्ध कराव्यात - उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार



**पुणे:**महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री विठ्ठलाच्या आषाढी एकादशीसाठी आळंदी येथून संत ज्ञानेश्वर महाराज यांची पालखी ८ जुलै व देहूवरून संत तुकाराम महाराज यांची पालखी ७ जुलै रोजी प्रस्ताण होणार आणि सासवड येथील संत सोपानकाका संस्थानकडून पालखी सोहळ्याची मोठी परंपरा असून,वारकऱ्यांसाठी अधिक सुविधायुक्त सोहळा आयोजित करण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिले.

आषाढी पालखी सोहळा-२०२६ च्या नियोजनाबाबत झुंबर हॉल,पुणे विभागीय कार्यालयात आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या. या बैठकीस पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष विरधवल जगदाळे,पुणे शहराच्या महापौर मंजुषा नागपुरे,पिंपरी-चिंचवडचे महापौर रवी लांडगे, विभागीय आयुक्त शितल तेली उगले,महाराष्ट्र मेट्रोरेल कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर,पुणे शहराचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार,पिंपरी-चिंचवड शहरचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे,पुणे महानगरपालिकेचे आयुक्त नवल किशोर राम,पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील आदी यावेळी उपस्थित होते.पालखी सोहळ्यांशी संबंधित विश्वस्त,पालखी प्रमुख,सातारा व सोलापूर जिल्ह्यांतील जिल्हाधिकारी,जिल्हा पोलीस अधीक्षक दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

# नवतंत्रज्ञानाचा स्वीकार करताना पत्रकारांनी सत्य पडताळणी आणि संपादकीय जबाबदारी अबाधित राखावी; मुंबईतील महाअधिवेशनात राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांचे आवाहन

मुंबई:''कृत्रिम बुद्धिमत्ता(AI)हे भविष्यातील एक अत्यंत महत्त्वाचे साधन असले, तरी संपूर्ण भविष्य केवळ एआयवर अवलंबून नाही. तंत्रज्ञानाच्या वापराला दिशा देणारी मानवी बुद्धिमत्ता,विवेक, सद्सद्विवेकबुद्धी आणि मूल्ये यावरच मानवाचे भवितव्य अवलंबून आहे. त्यामुळे पत्रकारांनी नवतंत्रज्ञानाचा जबाबदारीने स्वीकार करताना सत्य पडताळणी(**Fact-Check**)आणि आपली संपादकीय जबाबदारी नेहमी अबाधित राखावी,'' असे आग्रही आवाहन महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले.मुंबईतील यशवंतराव चव्हाण सभागृहात मराठी पत्रकार संघाच्या वतीने आयोजित पत्रकारांच्या राज्यस्तरीय महाअधिवेशनात ते मुख्य अतिथी म्हणून बोलत होते.

या प्रसंगी विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, प्रसिद्ध प्रेरणादायी वक्ते गौर गोपाल दास,सकाळ मीडिया समूहाचे समूह संपादक निलेश खरे, वरिष्ठ पत्रकार सरिता कौशिक, मृणालिनी नानिवडेकर, मराठी पत्रकार संघाचे राज्य अध्यक्ष किरण जोशी यांच्यासह राज्यभरातून आलेले




असंख्य पत्रकार बांधव उपस्थित होते.या अधिवेशनात मुख्यत्वे आधुनिक पत्रकारिता आणि कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयावर सखोल चर्चा करण्यात आली.

महाराष्ट्राच्या पत्रकारितेला समृद्ध वारसा: राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी आपल्या भाषणात महाराष्ट्राच्या वैचारिक आणि सामाजिक भूमीचे कौतुक केले.ते म्हणाले की, संतांच्या समता आणि बंधुभावाच्या संदेशासोबतच लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर, स्वातंत्र्यवीर सावरकर,डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि आचार्य अत्रे यांनी लेखणीच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे जे अद्वितीय कार्य केले, त्याचाच समृद्ध वारसा आजच्या पत्रकारांना लाभला आहे. उदारीकरणानंतर उपग्रह वाहिन्या, इंटरनेट,डिजिटल पोर्टल्स आणि पॉडकास्टमुळे माहितीप्रसारणाची पद्धत पूर्णपणे बदलली असून माध्यम संस्थांना सातत्याने अपडेट राहावे लागत आहे.

**डीपफेक आणि खोट्या बातम्यांचे आव्हान:** एआयमुळे पत्रकारांचे काम सोपे होत असले, तरी डीपफेक तंत्रज्ञान (**Deep-fake**) आणि बनावट दृश्य सामग्रीच्या माध्यमातून समाजात मोठा संभ्रम आणि खोटी माहिती पसरवण्याचा धोका वाढला असल्याबद्दल राज्यपालांनी चिंता व्यक्त केली.नागरिकांचा माध्यमांवरील विश्वास टिकवून ठेवण्यासाठी पत्रकारांची भूमिका आता अधिक महत्त्वाची ठरणार आहे. या पार्श्वभूमीवर,राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांचे कुलपती या नात्याने त्यांनी सर्व विद्यापीठांना माध्यम अभ्यासक्रमांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता साक्षरता,डिजिटल नैतिकता आणि डेटा पत्रकारिता या विषयांचा तातडीने समावेश करण्याचे निर्देश दिले असल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली

# पिं.चिं.महापालिकेच्या स्थायी समिती सभेत महत्त्व-पूर्ण विषयांना सभापती अभिषेक बारणे यांची मंजुरी

**पिंपरी:**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या झालेल्या स्थायी समिती सभेत शहराच्या सर्वांगीण विकास, आरोग्य सुविधा बळकटीकरण,शिक्षण,स्वच्छता, पायाभूत सुविधा, जलनिस्सारण व्यवस्था,रस्ते देखभाल तसेच सामाजिक व पर्यावरणीय उपक्रमांशी संबंधित विविध महत्त्वपूर्ण विषयांना स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी मंजुरी दिली.

यावेळी स्थायी समिती सदस्यांसह अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर,नगरसचिव मुकेश कोळप तसेच महापालिकेच्या



विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.सभेत 'क' क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत पिंपरी चिंचवड शहरात संविधान भवन व विपश्यना केंद्र उभारण्याच्या(टप्पा क्र.१)कामास मंजुरी देण्यात आली. संविधानातील लोकशाही,समता,बंधुता व न्याय या मूल्यांचे जतन आणि प्रसार करण्यासाठी संविधान भवन महत्त्वपूर्ण ठरणार असून विविध शैक्षणिक, सामाजिक आणि प्रबोधनात्मक उपक्रमांसाठी हे केंद्र उपयुक्त ठरणार आहे.**(क्रमश बातमी पान क्र २ वर)**




**सा प्रगत भारत वृत्तपत्र १८ वा वर्धापन दिन**
**व १९ व्या वर्षात यशस्वी पदार्पणा निमित्त हार्दिक शुभेच्छा..!**



ॐ कारं बिंन्दू संयुक्त नित्यं धायन्ति योगिना:।।कामद मोक्षदं चैव ॐ काराय नमो नम :।।

## संपादकीय

### साप्ताहिक प्रगत भारत वृत्तपत्र १८ व्या वर्धापन दिनानिमित्त..

आपल्या भारत देशामध्ये लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून वृत्तपत्रकास सन्मानपूर्वक स्थान आहे. साप्ताहिक 'प्रगत भारत' वृत्तपत्रकाची स्थापना १७ जून २००८ रोजी महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुणे जिल्ह्यातील पिंपरी-चिंचवड शहरातून मा.महापौर अपर्णाताई डोके यांच्या हस्ते पहिल्या अंकाचे प्रकाशन करण्यात आले,आज सदरचे मराठी वृतपत्र १८ वर्ष पूर्ण करून १९ व्या वर्षात यशस्वी पदार्पण करीत आहे या अल्पवधीत वृत्तपत्रकाचा झपाट्याने महाराष्ट्रात चौफेर विस्तार झाला.नियमित वर्षांपासून वृत्तपत्रक प्रकाशित होत आहे. पुण्याच्या क्षितिजावर चारही दिशांना वसलेल्या उपनगरातून व महाराष्ट्र राज्यातील अनेक शहरामधून साप्ताहिक 'प्रगत भारत'चे अनेक सभासद आहेत.तसेच मान्यवर व्यक्ती व विविध संस्था तसेच महाराष्ट्र शासनाच्या विविध जाहिराती या वृत्तपत्रकाला मिळत आहे.याचा आम्हांला सार्थ अभिमान आहे.वाचकांचे व समाजाचे प्रेम आमचे भांडवल आहे.त्यासाठी आम्हांला हवे आहेत आपले अधिकाधिक प्रेम! सहकार्य,मार्गदर्शन,जाहिरात स्वरूपात आर्थिक मदत व सभासद नोंदणी अभियानाला हजारोच्या संख्येने सहभाग व आशीर्वाद मिळावा.तसेच या वृतपत्राची सुरु केलेली www.pragatbharat.com ही वेब-साईट व त्यामधिल आसलेली विविध माहिती ही परिपूर्ण असून या मधून आपण जाहिरात,बातमी मुलाखत देऊ शकता.तसेच दररोजच्या ताज्या बातम्या घडामोडी शुभेच्छा जाहिरात ऑनलाइन जाहिरात ऑर्डर फॉर्म भरून व ऑनलाइन पेमेंट जमा करून देऊ शकता.तसेच वेबसाइट वरील Banner,Slider,Video, Interview या साठीही संपर्क साधू शकता. साप्ताहिक प्रगत भारत वृत्तपत्रकाचे संस्थापक संपादक दत्तात्रय कांबळे यांनी केलेल्या व करीत असलेल्या सामाजिक कार्याची दखल विविध संस्थांनी घेऊन त्यांना विविध क्षेत्रातील मिळालेले पुरस्कार: बंधुता प्रतिष्ठान पुणे,चिखली-आदर्श प्रशिक्षक,मातोश्री प्रतिष्ठान-पत्रकारिता क्षेत्रात उत्कृष्ट काम केल्याबद्दल-सन.२०१०'मातोश्री युवारत्न' पुरस्कारांनी सन्मानित,मराठा सेवा संघ महाराष्ट्र राज्य, व राजश्री शाहू शिक्षण परिषद यांच्या वतीने 'आदर्श योगासन व प्रमाणपत्र देऊन गौरव',पिंपरी-चिंचवड लघुउद्योग विकास समिती यांच्या वतीने सन्मानचिन्ह देऊन गौरव,संतुलन संस्था,पाषाण यांच्या वतीने 'आदर्श पत्रकार'म्हणून सन्मानपत्र देऊन गौरव.संत गुरु रविदास विचार समिती,निगडी पुणे-'संत गुरु रोहिदास सेवा पुरस्कार',राष्ट्रीय रविदास परिषद महाराष्ट्र राज्य सांगली जिल्हा वतीने-सन २०१५'समाज भूषण' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले,राष्ट्रीय श्रमिक आघाडीवतीने-'गुणवंत गौरव'पुरस्कार देऊन सन्मानित.तसेच सामाजिक बांधिलकी म्हणून व समाजाच्या न्याय हक्कासाठी राष्ट्रीय चर्मकार महासंघ या संघटनेचे संस्थापक अध्यक्ष माजी समाजकल्यामंत्री बबनराव घोलप यांच्या हस्ते संघटनेच्या महाराष्ट्र राज्य प्रसिध्दी प्रमुख पदी नियुक्तीपत्र देऊन जाहिर सत्कार केला आहे. नियुक्ती झाल्यामुळे खऱ्या अर्थाने समाजामधील काम करणाऱ्या युवा पिढीला तसेच विविध संघटनांना नियुक्तीबद्दल सार्थ अभिमान वाटत आहे.समाजाच्या व्याथा चित्ररण करणारे तसेच समाजातील होत असलेल्या अन्यायविरोधात आवाज उठविणे,अशा विषयाची विविधता प्रत्येक माहितीची विश्वासार्हता यामुळे आम्हाला तुमच्या हृदयात सा.'प्रगत भारत'चे स्थान मिळू शकले याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे.आपले अधिकाधिक प्रेम, सहकार्य व मार्गदर्शन व आशीर्वाद आहेच यापुढे ही वृध्दींगत होवो.

## तुका म्हणे जे जे बोला ते ते साजे या विठ्ठला!



**१६२५ साली सुरू झाला पालखी सोहळा..**

पंढरीच्या सावळ्या परब्रह्मांची विविध काळात विविध नावांनी उपासना केली आहे.पंढरीनाथ,पांडुरंग,पंढरीराया ,विठाई,विठोबा,विठुमाऊली,विठ्ठल गुरूराव,पांडुरंग,हरि,इत्यांदी. नांवे भक्तांनी दिलेली आढळतात. आज सर्व परिचित व प्रचलित नांव म्हणजे 'पांडुरंग'आणि 'श्रीविठ्ठल'विठ्ठल शब्दाची उत्पत्ती कशी झाली याचा अनेक इतिहासकारांनी व संशोधकांनी अभ्यास केला आहे.बरेच लोक विठ्ठल हा शब्द विष्णु या शब्दाचा अपभ्रंश आहे असे म्हणतात. कानडी शिलालेखातही जे विठ्ठरस,विठ्ठ असे शब्द आले आहेत ते विष्णु शब्दाची व्याप्ती सांगणारेच आहेत असे मानले जाते.संत तुकोबारायांनी विठोबा शब्दाची उत्पत्ती आपल्या एका अभंगात अत्यंत सोप्या भाषेत केली आहे. तो असा की वि म्हणजे ज्ञान ठोबा म्हणजे आकार -ज्ञानाचा आकार किंवा ज्ञानांची मूर्ती म्हणजे विठोबा किंवा वि म्हणजे गरूड अणि ठोबा म्हणजे आसन अर्थात गरूड ज्याचे आसन आहे तो विष्णू तोच कटीवर कर ठेवूनि विटेवरी उभा आहे.श्रीकृष्ण,श्रीविष्णु आणि श्रीविठोबा हे एकच आहेत.

कृष्णाचा अवतारद्वापार युगाच्या शेवटी बुधवारी श्रावण वद्य अष्टमीला झाला.विठोबा म्हणजे श्रीकृष्ण म्हणून बुधवार हा विठ्ठलाचा वार मानला जातो. आजही वारकरी लोक बुधवारी पंढरपुरातून जात नाहीत. पुराणातील श्लोकाप्रमाणे वि कारो विधाताय,ठ कारो नीलकण्ठ।ल कारो लक्ष्मीकांत,विठ्ठलाभिधिनीयमे ।।**अर्थ**-वि-विधाता-ब्रम्हदेव ठ्ठ-नीलकण्ठ-शंकर ल-लक्ष्मीकांत-विष्णू याप्रमाणे म्हणजेच ब्रह्मा विष्णू महेश हे एकाच ठिकाणी म्हणजेच विठ्ठल नावात आहेत. ।।श्रीविठ्ठल मुर्तीवर्णन।। दिनांचा दयाळू,भक्तकामकल्पद्रुम आणि योगिया दुर्लभ असलेल्या विठुरायाची मूर्ती स्वयंभू अशी वालुकामय शिलेची आहे. श्रींच्या मस्तकी मुकुटासारखी उंच कंगोरेदार टोपी आहे. याचा आकार शिवलिंगासारखा असल्यामुळे त्यासशिवलिंग म्हणतात.श्रींचे मुख उभट आहे.गाल फुगीर आहेत. दृष्टी समचरण आहे. कानी मकर कुंडले आहेत. गळ्यात कौस्तुभमणी आहे.पाठीवर शिंके असून हृदयस्थानी श्रीवत्सलांछन आहे. दोन्ही दंडावर अंगद असून मनगटावर मणिबंध आहेत. नितंब कराभ्याम् धृतो येन तस्मात् असे आद्यशंकराचार्यांनी श्रीविठ्ठल मूर्तीचे पांडुरंगाष्टक लिहून सुंदर व मार्मिक वर्णन केलेले आहे. श्रीविठ्ठलाने हात कटेवर ठेवलेले आहेत.उजव्या हातात कमळाचा देठ असून हात उताणा,अंगठा खाली येईल असा टेकविला आहे,तर डाव्या हातात शंख आहे. श्रींचे कमरेला तिहेरी मेखला आहे. छातीवर उजवीकडे भृगुऋषींनी पादस्पर्श केलेली खूण आहे.ब्रह्मदेव निघालेली नाभी आहे.कमरेला वस्त्र आहे. वस्त्राचा सोगा पावलापर्यंत आहे. डाव्या पायावर मृतकेषी नावाचे दासीने बोट लावलेची खूण आहे.अशी दगडी विटेवर उभी असलेली मूर्ती आहे. श्रींचे चरणस्पर्शदर्शन अथवा चरणी मस्तक ठेवून दर्शन घेवून समाधान प्राप्त करण्याचे भाग्य केवळ इथेच आहे.द्वापार युगात मुचकुंद नावाचा एक पराक्रमी राजा होवून गेला. देव-दैत्यांच्या युद्धात देवांनी त्याचे सहाय्य मागितले. मुचकुंद राजाने अतिशय पराक्रम गाजवून देवांना विजय मिळवून दिला. देवांनी प्रसन्न होवून वर मागण्यास सांगितले तेव्हा मुचकुंद म्हणाला, अत्यंत श्रमामुळे मी थकलो, मला एकांती गाढ निद्रा हवी.जो कोणी माझी निद्राभंग करील,तो माझ्या दृष्टीक्षेपाने भस्म होवून जावा.देवांनी तथास्तु म्हटले. राजा एका गुहेत निद्राधीन झाला. पुढे कृष्ण अवतारात जरासंधाकडून कालयौवन नावाचा अत्यंत बलाढ्य असा राक्षस कृष्णाकडे युद्धासाठी आला.हा राक्षस शस्त्र किंवा अस्त्राने मरणार नसल्याने भगवान श्रीकृष्णाने युक्तीने त्या दैत्यास ज्या गुहेत मुचकुंद राजा निद्राधीन झाला होता, त्या गुहेत नेले झोपलेल्या मुचकुंदावर आपल्या अंगावरचा शेला टाकला व स्वत: श्रीकृष्ण अंधारात लपले. भगवान श्रीकृष्णाचा शेला पाहून काळयौवनास वाटले की, कृष्णच झोपला आहे, हणून त्याने निद्रिस्त राजावर लत्ताप्रहार केले.मुचकुंद राजाची निद्राभंग झाली.क्रोधीत नजरेने कालयौवनाकडे पाहताच तो दैत्य कापराप्रमाणे जळून भस्म झाला. नंतर श्रीकृष्णाने राजाला दर्शन दिले. भगवान श्रीकृष्णांनी सर्व प्रसंग राजाला सांगितला. तेव्हा मुचकुंद राजाने आता दृष्टीपुढे ऐसाचि तू राहे अशी प्रार्थना केली. भगवान श्रीकृष्णाने पुढील जन्मी तुझी इच्छा पूर्ण करीन,असे अभिवचन दिले. हा मुचकुंद राजा कलियुगात भक्त पुंडलिकाच्या रूपाने जन्माला आला.दिंडीर वनात (पंढरपूर क्षेत्राजवळ) चंद्रभागेतिरी लोहदंड तीर्थाजवळ वास्तव्य करून राहिला.श्रीकृष्णास असलेल्या मुख्य ८ भार्यांपैकी राधिकादेवीस जवळ बसवून घेतल्याचे श्रीरूक्मिणी देवीने पाहिले असता सवतीमत्सरापोटी श्रीरूक्मिणी रागाने निघून येवून दिंडिरवनात तपश्चर्या करीत बसली. त्यावेळी रूक्मिणीचे शोधार्थ भगवान श्रीक्षेत्र पंढरपूरात आले असता रूक्मिणीचा शोध घेतला असता दिंडीर वनात तपश्चर्या करीत असल्याचे दिसले म्हणून तपश्चर्या भंग करू नये व मुचकुंद राजास पूर्वजन्मी दिलेल्या वरानुसार रूक्मिणीच्या शोधाचे निमित्त साधून तीर्थक्षेत्री पुंडलिकासाठी आले. पुंडलिक पूर्वाश्रमी माता-पित्याचा द्रोह करीत असे.पत्नीच्या हट्टासाठी तो तिच्याबरोबर काशीयात्रेस निघाला.जाताना कुक्कुट मुनीच्या आश्रमात राहिला. कुक्कुटमुनी परम मातृ-पितृ भक्त होते. माता-पित्याची निस्सीम सेवा केल्यामुळे त्यांना अलौकिक सामर्थ्य प्राप्त झाले होते. पापी, दुराचारी अधमांनी स्नान केल्याने दूषित मलीन झालेल्या गंगा, यमुना,सरस्वती या नद्या मालिन्यनाशासाठी व शुद्धतेसाठी आश्रमात रोज सेवा करीत. त्यामुळे त्यांना पावित्र्य व शुद्धता प्राप्त होई. हा प्रसंग पुंडलिकाने अनुभवला. नद्यांनी देवीरूपात त्यास उपदेश केला. त्याला ज्ञान प्राप्त झाले.त्याने माता-पित्याची अखंड सेवेची दीक्षा घेतली.तो पुन्हा पंढरीस आला. भक्तिभावाने माता-पित्याची सेवा करू लागला.पुंडलिकाची मातृ-पितृ भक्ती व सेवाव्रत पाहून भगवंत संतुष्ट झाले. ते पुंडलिकाचे भेटीसाठी लोहदंड तीर्थाजवळ आले. पुंडलिक माता-पित्याच्या सेवेत मग्न होते. भगवंताने त्यास दर्शन दिले, वर दिला. पुंडलिकाने त्याचे माता-पित्याची सेवा पूर्ण होईपर्यंत देवाला विटेवर उभे राहून प्रतिक्षा करण्याची विनंती केली. भगवंतानी त्याची प्रार्थना मान्य केली. पुंडलिकांनी देवाला उभा राहण्यासाठी वीट फेकली,ती वीट म्हणजे वृत्रासुराच्या शापाने दग्ध झालेला इंद्रच होय. भीमातीर म्हणजे दुसरी द्वारका, भगवान श्रीकृष्ण विठ्ठल रूपात कटीवर हात ठेवून भक्तासाठी युगे अठ्ठावीस अजूनही उभा आहे. संत शिरोमणी नामदेवराय आरतीत म्हणतात।। **पुंडलिका भेटी परब्रह्म आले गा ।।.(संग्रहीत माहिती..सा.प्रगत भारत)**

## जगदगुरू संत तुकाराम महाराज यांचे महातम



**संत तुकाराम हे इ.स.च्या सतराव्या शतकातील एक वारकरी संत-कवी होते.त्यांचा जन्म देहु या गावात वसंत पंचमीला-माघ शुद्ध पंचमीला झाला. पंढरपूरचा विठोबा हे तुकारामांचे आराध्यदैवत होते. तुकारामांना वारकरी जगद्गुरू म्हणून ओळखतात. जन्मतारीख २१ जानेवारी,१६०८ जन्मस्थळ देहू मृत्यूची तारीख १९ मार्च,१६५० मृत्यूस्थळदेहूपूर्ण नाव तुकाराम बोल्होबा अंबिले**

आईकनकाई बोल्होबा आंबिलेव आई कनकाई यांच्या पोटी जन्मलेल्या तुकाराम महाराज यांचे आडनाव अंबिले होते.त्यांच्या घराण्यातील मूळ पुरुष विश्वंभरबुवा हे महान विठ्ठलभक्त होते. त्यांच्या घराण्यात पंढरीची वारी करण्याची परंपरा होती. त्यांना सावजी हा मोठा भाऊ व कान्होबा धाकटा भाऊ होता. त्यांचे बालपण सुखात गेले. त्यांचा मोठा भाऊ सावजी विरक्त वृत्तीचा होता.त्यामुळे घराची संपूर्ण जबाबदारी तुकोबांच्यावरच होती. पुण्याचे आप्पाजी गुळवे यांची कन्या जिजाई (आवडी) यांच्याशी त्यांचा विवाह झाला.तुकोबारायांना त्यांच्या प्रापंचिक जीवनात अनेक दु:खे सहन करावी लागली. ते १७-१८ वर्षांचे असताना त्यांचे आई-वडील मरण पावले,मोठा भाऊ विरक्तीमुळे तीर्थाटनाला निघून गेला.

## पिं.चिं.महापालिकेच्या स्थायी समिती सभेत विविध विकासकामे,महत्त्वाचे विषय मंजूर

**(क्रमश बातमी पान क्र १ वरून)**

तसेच 'ह' क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत वायसीएम रुग्णालयाकडील पाणीपुरवठा पंप चालविणे तसेच इमारतीमधील विद्युत व्यवस्थेची चालन, देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी अर्धकुशल व अकुशल कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यास मंजुरी देण्यात आली.महापालिकेच्या विविध विभागांच्या दैनंदिन कामकाजासाठी खरेदी करण्यात आलेल्या कॅनॉन कंपनीच्या प्रिंटरसाठी एक वर्ष कालावधीकरिता टोनर्सची दरकरारानुसार खरेदी,तसेच महानगरपालिकेच्या मराठी माध्यम बालवाडीतील विद्यार्थ्यांसाठी मूलभूत शिक्षणांतर्गत लेखन साहित्य खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली.आरोग्य सुविधांच्या दृष्टीने नवीन भोसरी रुग्णालय व यमुनानगर रुग्णालयाच्या इमारतीतील कॉरिडॉर, अंतर्गत व बाह्य परिसर, रस्ते, पार्किंग,उद्यान क्षेत्र,डक्ट व ड्रेनेज लाईनची दैनंदिन साफसफाई, तसेच नवीन थेरगाव रुग्णालयातील कोविड-१९ आपत्कालीन कालावधीत सीएसआर निधीतून प्राप्त ९ व्हेंटिलेटर व ३ मोबाईल एक्स-रे मशीनच्या देखभाल-दुरुस्ती करारास मंजुरी देण्यात आली.याशिवाय वैद्यकीय विभागाकडील १७ व्हेंटिलेटर्सची सीएमसी करण्यास आणि यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात आवश्यकतेनुसार विविध पदे सहा महिन्यांच्या कालावधीसाठी मानधन तत्त्वावर भरण्यास मान्यता देण्यात आली.महापालिका कार्यक्षेत्रातील मुस्लिम(३),ख्रिश्चन(१)व लिंगायत(१) दफनभूमी परिसरांची २४ तास देखभाल, स्वच्छता, सुरक्षा व आवश्यक प्रशासकीय कामांसाठी काळजीवाहकांची नेमणूक करण्यास मंजुरी देण्यात आली.जलनिस्सारण व्यवस्थेच्या सुधारणेसाठी थेरगाव,गांधीनगर,बालाजीनगर,संजय गांधी नगर, शांतीनगर या झोपडपट्टी भागांतील जलनिस्सारण नलिकांची देखभाल व दुरुस्ती,तसेच 'अ' क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत जलनिस्सारण विभागाने खोदलेल्या चरांची दुरुस्ती करून रस्ते पूर्ववत करणे,चेंबर दुरुस्ती व समपातळीकरणाची कामे मंजूर करण्यात आली.यासोबतच प्रभाग क्रमांक १, ११, १२ व १३ मधील ड्रेनेज वाहिन्यांसाठी खोदलेल्या चरांचे हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरण करून रस्ते पूर्ववत करणे,तसेच पिंपरी व रहाटणी परिसरातील जलनिस्सारण नलिका टाकण्यासाठी खोदलेल्या चरांचे हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरण करून रस्ते पूर्ववत करण्याची कामे मंजूर करण्यात आली.शहरातील वाढत्या लोकवस्तीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक १ मधील चिखली गावठाण, मोरे वस्ती,सोनवणे वस्ती,शेलार वस्ती,रामदास नगर,पाटीलनगर आदी भागांमध्ये,तसेच प्रभाग क्रमांक १२ मधील रूपीनगर, गणेशनगर,तळवडे व इतर भागांमध्ये आवश्यकतेनुसार जलनिस्सारण व्यवस्थेमध्ये सुधारणा करून नवीन नलिका टाकण्याच्या कामांना मंजुरी देण्यात आली.तसेच प्रभाग क्रमांक २० मधील संत तुकाराम नगर व इतर परिसरांमध्ये,प्रभाग क्रमांक २८ मधील पिंपळे सौदागर व रहाटणी परिसरात, तसेच प्रभाग क्रमांक ३२ मधील जुनी सांगवी येथील मुळानगर व इतर भागांमध्ये जलनिस्सारण व्यवस्थेतील आवश्यक सुधारणा व नवीन नलिका टाकण्याची कामे मंजूर करण्यात आली.

## संत ज्ञानेश्वर महाराज यांचे महात्म्य



संत ज्ञानेश्वर महाराजांच्या जीवनाबद्दलचा थोडाफार लेख प्रसिद्ध करत आहोत. पैठण येथील पुर्वेला सुमारे आठ मैलावर गोदावरी नदीच्या उत्तर तीरावर आपेगाव नावचे गाव आहे. संत ज्ञानेश्वरांचे पुर्वजांना या गावामध्ये कुळकर्णी वतन होते. उपलब्ध माहितीनुसार ज्ञानेश्वरांचे एक पुर्वज हरिपंत हे शके १०६० (सन११३८) मध्ये येथील वतनदार होते.

त्यांच्यानंतर त्यांचे वंशज रामचंद्रपंत तद्नंतर त्यांचे पुत्र गोपालपंत, नंतर त्रिंबकपंत यांच्याकडे ही वतनदारी वंशपरंपरेने आली.त्या वेळी राजा जैत्रपालाचे राज्य होते त्यांनी त्रिंबकपंतांचे पुत्र हरिपंत यांना राज्यामधून देशमुखांची बंडखोरी मोडून काढण्याचे कार्य सोपवले. ही बंडखोरी मोडून काढताना झालेल्या युद्धामध्ये दुर्दैवाने हरिपंतांचा मृत्यू झाला.पुत्राच्या मृत्यनंतर व्यथित झालेल्या त्रिंबकपंतांचे

प्रगत भारत हे साप्ताहिक वृत्तपत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक संपादक दत्तात्रय तानाजी कांबळे. यांनी त्रिमुर्ती मुद्रिका,५४/२६ एम.आय.डी.सी.चिंचवड पुणे-१९ येथे छापून रजि.मुख्य कार्यालय ऑ.नं.२४,साईकृपा भवन, पहिला मजला, पुणे-मुंबई रोड, खराळवाडी, पिंपरी, पुणे-१८ येथून प्रकाशित केले.संपर्क मो. ९८६०८७७७८९, Web:www.pragatbharat.com सदर अंकात प्रसिध्द झालेल्या वृत्तांशी किंवा लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही सर्व कायदेशिर बाबी पिंपरी न्यायालयाअधिन.(पी.आर.बी.कायद्यानुसार जबाबदारी)● RNI No. MAH/MAR/2008/25149 ● Dec. No. PHM/SR/136/VIII/2008 Published on Tuesday and Posted on Thursday
POSTED AT PIMPRI P.F. POST OFFICE LICENCE NO. Reg. No. PCE/006/2024-2026'pragat Bharat' Weekly News paper is owned,printer & Published by Dattatraya Tanaji Kamble,Printed at shree Trimurti Mudrika 54/26,D-2 lockMIDC,Chinchwad,Pune-411018 ● Editor:Dattatraya kamble Email - pragatbharat@gmail.com, Web:www.pragatbharat.com ●RNI No. MAH/MAR/2008/25149 ● legal disputes under pimpri court jurdion



## दिवंगत डॉ.अशोक (भाऊ) शिलवंत यांच्या ६४ व्या जयंतीनिमित्त गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव



**अशोक सर्वांगीण विकास सोसायटी, पुणे यांच्या वतीने पिंपरी-चिंचवड महानगरपालिका शाळांमधील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करून त्यांना शिष्यवृत्ती प्रदाण करण्यात आले.यावेळी मान्यवर व्यक्ती उपस्थित होते.**

पुणे-महाराष्ट्र मधील बातम्या पहा.
www.pragatbhart.com

**पिंपरी:दिवंगत समाजसेवक, शिक्षणप्रेमी व अशोक सर्वांगीण विकास सोसायटीचे संस्थापक डॉ. अशोक (भाऊ) शिलवंत यांच्या ६४ व्या जयंतीनिमित्त विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका शाळांमधील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करून त्यांना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली.**

इयत्ता दहावीच्या परीक्षेत संपूर्ण पिंपरी-चिंचवड महानगरपालिका शाळांमधून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या कु.प्रणव लोटन शिंदे आणि कु.आरती नागप्पा खैतनार यांचा शिष्यवृत्ती देऊन सत्कार करण्यात आला.तसेच जागृत अपंग संघटना संचलित महात्मा फुले अपंग प्रशिक्षण केंद्र,माण येथील विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्यात आले.

कार्यक्रमास ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व विचारवंत आयु. मानव कांबळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.अध्यक्षीय समारोप करताना त्यांनी डॉ. अशोक (भाऊ) शिलवंत यांच्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला. ते म्हणाले,''समाजात केवळ मागणारे न होता देणारे होण्याची वृत्ती जोपासली पाहिजे.डॉ. अशोक (भाऊ) शिलवंत यांनी आपल्या आयुष्यात समाजाला देण्याचे कार्य अखंडपणे केले. त्यांचे समाजकार्य,शिक्षणप्रेम आणि सर्वसामान्यांप्रती असलेली बांधिलकी ही कधीही विसरता येणार नाही.आज शिलवंत परिवार त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा वारसा समर्थपणे पुढे नेत असून, हा उपक्रम त्याच सामाजिक जाणिवेचे आणि सेवाभावाचे जिवंत उदाहरण आहे.''संस्थेची माहिती देताना ते पुढे म्हणाले की अपंगांनी अपंगांसाठी चालवलेली देशातील एकमेव संस्था असेल.

यावेळी बोलताना आयु. मानव कांबळे यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले.ते म्हणाले,''इयत्ता दहावीच्या परीक्षेत पिंपरी-चिंचवड महानगरपालिका शाळेत प्रथम क्रमांक मिळविणारे हे विद्यार्थी पालिकेच्या शाळेत शिक्षण घेत असून, त्यांच्या यशाने सर्व विद्यार्थ्यांसमोर एक आदर्श निर्माण केला आहे. आर्थिक परिस्थिती मर्यादित असली तरी जिद्द, मेहनत आणि बौद्धिक क्षमता यांच्या जोरावर कोणतीही स्वप्ने साकार करता येतात,हे या विद्यार्थ्यांनी सिद्ध करून दाखवले आहे. योग्य मार्गदर्शन आणि संधी मिळाल्यास हे विद्यार्थी भविष्यात निश्चितच मोठी भरारी घेतील आणि समाजाचे नाव उज्ज्वल करतील.यावेळी संस्थेच्या कार्याध्यक्ष आयु.नलिनी इनामदार,संस्थेचे मुख्याध्यापक आयु. जगताप सर सामाजिक कार्यकर्ते आयु. प्रताप गुरव,पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे निवृत्त अधिकारी आयु.शरद जाधव,आयु.रवींद्र दुधेकर,आयु. वसंत साळवी तसेच आयु. अनिल सूर्यवंशी तसेच श्रीमती कल्पना अशोक शिलवंत यांची प्रमुख उपस्थिती प्रास्ताविक डॉ. सुलक्षणा शिलवंत-धर सूत्रसंचालन प्रा.दिलीप कांबळे आभार प्रदर्शन अॅड.राजरत्न शिलवंत यांनी केले.कार्यक्रमाचे आयोजन अशोक सर्वांगीण विकास सोसायटी, पुणे यांच्या वतीने करण्यात आले.

## शिक्षण मंडळाचा भ्रष्टाचार थांबवा अन्यथा आंदोलन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा-शहराध्यक्ष चेतन पवार

पुणे-महाराष्ट्र मधील बातम्या पहा.
www.pragatbhart.com



**शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष चेतन पवार यांनी शुक्रवारी पिंपरी येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत दिला.यावेळी उपजिल्हाप्रमुख रोमी संधू,शहर समन्वयक कैलास नेवासकर,शहर कार्यालय सचिव ज्ञानेश्वर शिंदे,जिल्हा संघटिका अनिता तुतारे, चिंचवड विधानसभा संघटिका वैशाली काटकर,वैशाली कुलथे, पिंपरी उपशहर प्रमुख अमोल निकम समन्वयक पार्थ गुरव, उपशहर प्रमुख दिलीप सावंत, श्रीमंत गिरी, विशाल चव्हाण, योगेश राऊत, उज्वला सावंत, तस्लीम शेख, कलावती नाटेकर, बेबी सय्यद, पूनम रिठे, वंदना खंडागळे आदी उपस्थित होते.**

**पिंपरी:पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळात असणारा भ्रष्टाचार आणि भोंगळ कारभाराबाबत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने वेळोवेळी आयुक्तांकडे तक्रार केली आहे. यामध्ये पुनावळे येथील मनपा शाळेचे आरक्षण तुटपुंज्या रकमेवर खासगी संस्थेला देण्याचा घाट घातला जात आहे.त्या आरक्षित जागेवर मनपाने गोर गरीब मुलांसाठी शाळा सुरू करावी.या शाळेचे आरक्षण खासगी संस्थेला देणे म्हणजे मनपाचे खासगीकरण करण्याचा प्रकार आहे. हा ठराव आयुक्तांनी मंजूर करू नये आणि मनपाचे खासगीकरण थांबवावे नाही तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष चेतन पवार यांनी शुक्रवारी पिंपरी येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत दिला.**

यावेळी उपजिल्हाप्रमुख रोमी संधू,शहर समन्वयक कैलास नेवासकर,शहर कार्यालय सचिव ज्ञानेश्वर शिंदे,जिल्हा संघटिका अनिता तुतारे, चिंचवड विधानसभा संघटिका वैशाली काटकर,वैशाली कुलथे, पिंपरी उपशहर प्रमुख अमोल निकम समन्वयक पार्थ गुरव, उपशहर प्रमुख दिलीप सावंत, श्रीमंत गिरी, विशाल चव्हाण, योगेश राऊत, उज्वला सावंत, तस्लीम शेख, कलावती नाटेकर, बेबी सय्यद, पूनम रिठे, वंदना खंडागळे आदी उपस्थित होते.

यावेळी चेतन पवार यांनी सांगितले की,पुनावळे येथील शाळेचे आरक्षण ईस्ट ऑक्सफर्ड इंटरनॅशनल फाउंडेशन यांना भाडे कराराने देऊ नये.भूमी जिंदगी कार्यालय कडून भाडे प्रती चौरस फुट ३ रु ६० पैसे असा ठरविण्यात आले आहे. हे सर्व संशयास्पद असून नक्की कोणत्या आधारे हा दर ठरविण्यात आला आहे हे स्पष्ट करावे. तेथे पिंपरी चिंचवड मनपा कडून गोर गरिबांच्या मुलांसाठी चांगल्या दर्जेदार स्वरूपाची शाळा उभारावी. तसेच मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय गणवेश देण्यासाठी जगदंब महिला रेडीमेड ड्रेसेस यांना कोणतीही निविदा प्रक्रिया न करता हा ठराव पास करण्यात आला हे कोणाच्या दबावात झाले. याचे स्पष्टीकरण द्यावे तसेच यामध्ये गणवेशाची रक्कम वाढवून दाखवण्यात आली आहे, हा ठराव रद्द करून याची कायदेशीर निविदा प्रक्रिया करावी.

तसेच पिंपरी चिंचवड शहरात पाणी पुरवठा करणाऱ्या पवना नदीची दुरवस्था झाली आहे. पवना नदीत राडारोडा टाकून नदीपात्र छोटे करण्याचे काम चालू आहे. काही ठिकाणी डायरेक्ट पाईप लाईन द्वारे अस्वच्छ पाणी नदीपात्रात सोडण्यात आले आहे. तर रावेत हायवे वरील ब्रीज खाली अनेक लोक जुगार खेळत असून नदीत कचरा टाकतात.

ताथवडे येथील सर्वे नं ६४/२/१ मधील जागा बिल्डरकडून विकसित होत असताना नगररचना विभागाकडून अभिप्राय घेतला असता सदरील जागेत नाला असे दाखविले आहे. परंतु प्लॅन पास करताना नाला सी आकारात शिफ्ट करण्यात आला असून त्यामुळे अनेक लोकांचे नुकसान होणार आहे.या ठिकाणाचा बांधकाम परवाना रद्द करावा.तसेच ताथवडे गाव येथील जिल्हा परिषदेची शाळा महानगर पालिकेकडे वर्ग करण्याबाबत २०१३ साली शासन आदेश होवून सुद्धा आज पर्यंत ती वर्ग करून घेत नाही असा मनमानी कारभार महानगरपालिकेत सुरू आहे. याला पायबंद घालावा अन्यथा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलनचा इशारा यावेळी शहराध्यक्ष चेतन पवार यांनी दिला

## पालखी मार्गांचे हरितीकरण एक लोकचळवळ बनवू या;'निर्मल वारी-हरित वारी' उपक्रमासाठी मंत्री अॅड. आशिष शेलार यांचे निर्देश

**मुंबई:**आषाढी वारीच्या महान परंपरेला पर्यावरण संवर्धनाची जोड देत राज्यातील पालखी मार्गांचे व्यापक हरितीकरण करण्यास शासन कटिबद्ध आहे. हा उपक्रम शासन, आध्यात्मिक संस्था आणि लोकसहभागाच्या माध्यमातून एक प्रभावी लोकचळवळ म्हणून राबविण्याचे निर्देश माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री अॅड. आशिष शेलार यांनी दिले. मंत्रालयात आयोजित 'निर्मल वारी आणि हरित वारी' उपक्रमाच्या विशेष आढावा बैठकीत ते बोलत होते. पंढरपूर संस्थानचे विश्वस्त तथा संत तुकाराम महाराज यांचे वंशज शिवाजीराव मोरे यांनी केलेल्या विनंतीची प्राधान्याने दखल घेत या बैठकीचे तातडीने आयोजन करण्यात आले होते.राज्यातील संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज पालखी मार्गांवर वारकऱ्यांना तीव्र उन्हापासून दिलासा देण्यासाठी आणि सावली मिळवून देण्यासाठी व्यापक हरित पट्टे विकसित करण्यात येत आहेत. या बैठकीला सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी, पर्यावरण व हवामान बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अभिजीत औटे, वन विभागाचे विवेक खांडेकर तसेचग म्हणून वरिष्ठ सनदी अधिकारी मिलिंद म्हैसकर यांच्याशी चर्चा करून पालखी मार्गांवर प्राधान्याने वृक्षारोपण करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी ४११०१८

उद्यान/वृक्षसंवर्धन विभाग

ई निविदा नोटीस क्रमांक -वृक्ष ०१/२०२६-२०२७

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वृक्षसंवर्धन विभागाकडील पिंपरी चिंचवड शहरामधील कचरा श्रेडींग करणेकामी ट्रॅक्टर भाडेतत्वावर घेणे साठीचे ई टेंडर अंतर्गत नोदणीकृत ठेकेदाराकडुन (GSTवगळुन) निविदा मागविणेत येत आहेत.

| अ. क्र. | उद्यानाचे नाव | निविदा र,रु. | बयाणा र,रु. | अनामत र.रु. | कामाची मुदत | निविदा फार्म फी परत न मिळणारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मनपाचे सर्व क्षेत्रीय कार्यालयातील उद्यान /वृक्षसंवर्धन विभागामधिल फांद्या/कचरा श्रेडींग करणे कामी ट्रॅक्टर(ट्रॉलीसह) (५५ HP) भाडेतत्वावर ०१ वर्षे कालावधीसाठी पुरविणे व देखभाल करणे | ८५,७०,३४०/- | ८५,७०३/- | ४,२८,५१७/- | ०१ वर्ष | ३,१४७/- |

**निविदेचे वेळापत्रक**

| | |
|---|---|
| ई- निविदा उपलब्ध कालावधी | दिनांक : १६/०६/२०२६ ते २३/०६/२०२६ |
| निविदा स्विकृती अंतिम दिनांक व वेळ | दिनांक : २३/०६/२०२६ दुपारी ३.०० पर्यंत |
| निविदा उघडणेचा दिनांक | दिनांक : २४/०६/२०२६ सकाळी ११.०० वा. |

कोणतेही कारण न देता निविदा पुर्णता किंवा अंशता मंजुर अथवा नामंजुर करणेचा अधिकार मा. अति.आयुक्त यांनी स्वता कडे राखून ठेवला आहे. निविदा संचाची विक्री https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ई निविदा सुचनेत नमुद केलेल्या तारखेनुसार सुरू राहिल.सविस्तर निविदा व निविदेबाबतची इतर माहिती खालील संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

१.सदरची निविदा https://mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

सदरची ई निविदाप्रणाली वापराबाबत काही तांत्रिक अडचण निर्माणझाल्यास NIC यांचेकडील ईमेलsupport-eproc@nic.in अथवा Help Desk Number 0120-4200462, 0120-4001002, 0120-4001005, 0120-6277787 या दुरध्वनीवरसंपर्क साधावा.

सही/-
अति. आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८

जाहिरात क्रमांक - 2026-27/62
क्रमांक - उदयान/०४/कावि/२१६/२०२६
दिनांक – १५/०६/२०२६

## सुभद्रा भुजबळ यांचे निधन



**पिंपरी:**पिंपरी गावातील ज्येष्ठ नागरिक सुभद्रा गोविंद भुजबळ (वय ७५ वर्षे) यांचे शनिवारी (दि.१३)निधन झाले. त्यांच्या मागे तीन मुले,एक मुलगी, सुना व नातवंडे असा परिवार आहे. 'सकाळ'चे जाहिरात विभागातील सरव्यवस्थापक मिलींद भुजबळ, डॉ. नितीन भुजबळ आणि संरक्षण विभागातील अधिकारी संतोष भुजबळ यांच्या त्या मातोश्री होत. पिंपरी गावातील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर रविवारी (ता. १४) सकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी समाजातील विविध स्तरातील मान्यवर उपस्थित होते.

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,पुणे-४११००१**
**दुरध्वनी क्रमांक**-०२०-२६१२२४८५ व २६१२२४१४ **फॅक्स क्र.**०२०/२६१२२४८५
Web-www.mahapwd.gov.in & e-mail-northpune.ee@mahapwd.gov.in

**निविदा सूचना क्रमांक १४ सन २०२६-२०२७**

कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,पुणे मध्यवर्ती इमारत आवार पुणे-१(दुरध्वनी क्रमांक-०२०-२६१२२४८५/२६१२२४१४)हे महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग,शासन निर्णय क्रमांक सीएटी/२०१७/प्र.क्र.०८ इमा-२,दिनांक २७/९/२०१८ व शासन सा.बां.विभाग मुंबई परिपत्रक क्र.सीएटी/२०१७/प्र.क.८/इमा-२ दिनांक २२/१०/२०१८ आणि शासन सां.बा.विभाग,मंत्रालय,मुंबई शासन निर्णय क्रमांक सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२ दिनांक २०/५/२०२१ आणि शासन निर्णय क्र. सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/इमा-२,दिनांक ३१/०८/२०२३ आणि शासन निर्णय क्र.२०२२२/प्र.क्र.१०४/इमा-२ दिनांक १४/२/२०२५ अन्वये महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे पुणे जिल्ह्यामध्ये योग्य त्या वर्गामध्ये नोंदणीकृत असलेल्या कंत्राटदारांकडून पुणे येथील रूपये १०,०० लक्ष पेक्षा कमी अंदाजपत्रकीय किंमतीचे कामांसाठी बी-१ नमुन्यातील स्पर्धात्मक निविदा मागवित आहेत.

कामांचे ब-१ नमुन्यातील कोरे निविदा संच सार्वजनिक बांधकाम खात्यातील संकेतस्थळ **mahapwd.gov.in** मध्ये **Employee Corner-Application-Pay PWD Online** येथे दि.१६/०६/२०२६ ते २२/०६/२०२६ पर्यत खरेदी करण्यात येऊन निविदा सादर भरावयाच्या आहेत.भरून पाठविलेल्या निविदा दि.२५/०६/२०२६ पर्यत दुपारी २.०० वाजेपर्यंत स्विकारतील आणि त्याच दिवशी दुपारी ३.३० नंतर (शक्य झाल्यास) उघडण्यात येतील.इतर अटी व शर्ती ब-१ निविदा नमुन्यामध्ये पाहावयास मिळतील.तसेच कामांच्या निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकारी तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकारी कार्यकारी,अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग पुणे-१ यांनी राखून ठेवलेला आहे.कंत्राटदारांची अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

सही/-
(प्रशांत शं.खैरमोडे)
कार्यकारी अभिंयता,
सार्वजनिक बांधकाम
विभाग,पुणे-४११००१

जिमाका/पुणे/जाहिरात/७३/२०२२६-२७

# पीसीसीओइआरचे प्रा.डॉ.समीर सावरकर यांना शूटिंग स्पर्धेत रौप्य पदक

विविध विभागाच्या ताज्या बातम्या पहा.
www.pragatbhart.com




**पिंपरी:**पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या रावेत येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग मधील विभाग प्रमुख प्रा.डॉ.समीर सावरकर यांनी महाराष्ट्र रायफल असोसिएशन वरळी, मुंबई येथे आयोजित करण्यात आलेल्या कप्तान एस.जे.एझिकेल मेमोरियल महाराष्ट्र राज्य शूटिंग चॅम्पियनशिप या राज्यस्तरीय शूटिंग स्पर्धेत ०.२२ कॅलिबर लॉग रायफल ५० मीटर प्रोन (पालथ्याने) या प्रकारात उत्कृष्ट नेमबाजी करत रौप्य पदक पटकावले.डॉ.सावरकर यांना राष्ट्रीय प्रशिक्षक शंतनू भिडे यांनी मार्गदर्शन केले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले,सचिव विठ्ठल काळभोर,खजिनदार शांताराम गराडे,विश्वस्त हर्षवर्धन पाटील,उद्योजक नरेंद्र लांडगे,अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ.गिरीश देसाई, पीसीसीओईआर चे प्राचार्य डॉ.हरीश तिवारी यांनी प्रा.डॉ.समीर सावरकर यांचे अभिनंदन केले.






# आळंदीत थोरवे आणि कांबळे परिवारातर्फे 'कमला एकादशी' निमित्त महाप्रसादाचे वाटप;२५ वर्षांची परंपरा जपली!

विविध विभागाच्या ताज्या बातम्या पहा.
www.pragatbhart.com

**आळंदी:श्री क्षेत्र आळंदी येथील हराळे वैष्णव धर्मशाळा येथे दर ३ वर्षांनी अधिक मास महिन्यात येणाऱ्या 'कमला एकादशी' निमित्त मुळशी तालुक्यातील कासारसाई आणि लवळे येथील थोरवे आणि कांबळे परिवारातर्फे भव्य अन्नदान आणि बारशीचा (द्वादशी) कार्यक्रम उत्साहात पार पडला.**

मागील २५ वर्षांपासून सुरू असलेली ही अखंड धार्मिक परंपरा यावर्षीही दोन्ही परिवारांनी मोठ्या भक्तीभावाने जपली.११ जून रोजी महाप्रसादाचे वाटपदिनांक ११ जून २०२६ रोजी, एकादशीच्या दिवशी संध्याकाळी आळंदीत जमलेल्या भाविकांसाठी फराळाचे आणि भोजनाचे विशेष नियोजन करण्यात आले होते. उपवास असलेल्या भाविकांसाठी खास साबुदाणा खिचडीची सोय करण्यात आली होती. तर इतर सर्व भाविकांसाठी स्वादिष्ट मसाले भात व शिरा असा महाप्रसाद देण्यात आला. यावेळी भाविक ५०० हून अधिक भाविकांना अन्नदान दुसऱ्या दिवशी,म्हणजेच १२ जून रोजी सकाळी बारशीचा मुख्य कार्यक्रम संपन्न झाला. या दोन्ही परिवारांतर्फे सुमारे ५०० हून अधिक लोकांसाठी महाप्रसादाचे आणि अन्नदानाचे आयोजन करण्यात आले होते. हजारो वारकऱ्यांच्या उपस्थितीत आणि भक्तीमय वातावरणात बारस सोडण्याचा कार्यक्रम पार पडला. या संपूर्ण कार्यक्रमासाठी नारायन गाडेकर पुजारी आदींचे यावेळी मार्गदर्शन लाभले.सदरचा कार्यक्रम एकजुटीतून आणि लोकवर्गणीतून आयोजन करण्यात आले होते.यावेळी



साप्ताहिक प्रगत भारत वृत्तपत्रकाचे संपादक दत्तात्रय कांबळे यांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या.या भक्तिमय सोहळ्याचे यशस्वी नियोजन करण्यासाठी अंबर थोरवे, मच्छिंद्र थोरवे,सुभाष थोरवे,ईश्वर थोरवे,विशाल थोरवे,तुकाराम थोरवे तसेच ज्ञानेश्वर कांबळे, गणेश कांबळे,महेश कांबळे व राजू कांबळे यांनी विशेष परिश्रम घेतले.या अन्नदान आणि बारशीच्या कार्यक्रमासाठी लागणारा सर्व खर्च थोरवे आणि कांबळे परिवारातील सर्व सदस्यांनी एकत्रितपणे विभागून गोळा केला. तसेच काही भाविकांनी देणगी दिली,या सर्व देणगीदारांचे संयोजकांतर्फे विशेष आभार मानण्यात आले.






# क्राइस्ट युनिव्हर्सिटी, पुणे लवासा कॅम्पस येथे पदवीदान समारंभ २०२६ दिमाखात संपन्न



**पुणे:**क्राइस्ट युनिव्हर्सिटी, पुणे लवासा कॅम्पस येथे १३ जून २०२६ रोजी,२०२६ च्या पदवीदान समारंभ साजरा झाला. कायदा (Law), व्यवसाय प्रशासन (Business Administration),वाणिज्य (Commerce),इंग्रजी आणि सांस्कृतिक अभ्यास(English & Cultural Studies) आणि माहिती विज्ञान(Data Science) यांसारख्या विविध शैक्षणिक शाखांमधून यशस्वीरित्या पदवी प्राप्त करणाऱ्या ४९२ विद्यार्थ्यांसाठी हा अत्यंत महत्त्वपूर्ण क्षण होता.या समारंभास उद्योग क्षेत्रातील मान्यवर नेते,विद्यापीठाचे अधिक ारी,विभागप्रमुख,प्राध्यापक,पालक विद्यार्थी उपस्थित होते.

पदवीदान समारंभास टाटा प्रोजेक्ट्स लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक आणि सीईओ विनायक पै आणि अदानी कॉर्पोरेट हाऊसचे सीईओ (जीसीसी) संजीव रस्तोगी यांनी प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित होते.पदवीदार समारंभाचे अध्यक्षस्थान क्राइस्ट युनिव्हर्सिटीच्या वरिष्ठ नेतृत्वाने भूषवले.कुलपती डॉ.फादर साजू चाकलाकल (CMI) आणि कुलगुरू डॉ.फादर जोसेफ सी.सी. त्यांच्यासोबत डॉ.अनिल जोसेफ पिंटो(कुलसचिव),डॉ.ज्योती कुमार (शैक्षणिक कुलसचिव) आणि डॉ.विजयशंकर ए.व्ही. (परीक्षा नियंत्रक) हे देखील उपस्थित होते.पुणे लवासा कॅम्पसचे संचालक डॉ.फादर लिजो थॉमस आणि सहयोगी-संचालक डॉ.एस.परमेश्वरन हे देखील पदवीधर विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन करण्यासाठी आणि त्यांचे अभिनंदन करण्यासाठी उपस्थित होते.








